जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

22 MAR 2017 लोकमत

# 'इंडो-जर्मन टूल रुम' अभ्यासक्रम सुरु

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागात औरंगाबादमधील इंडो-जर्मन टूल रुमच्या सहकार्याने 'सॉलिड वर्क्स' या थ्री-डी मॉडेलिंग सॉफ्टवेअरच्या प्रशिक्षण अभ्यासक्रमाची सुरुवात झाली आहे.

या अभ्यासक्रमाच्या प्रारंभावेळी तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक प्रा. जयदीप बागी, प्रशिक्षक सुबोध कुमार यांनी मनोगत व्यक्त केले. प्रा. श्रीकांत भोसले, हर्षवर्धन पंडित, आदी उपस्थित होते. सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांच्या वाढ व विकासाला चालना देण्याकरिता भारत सरकारने इंडो-जर्मन टूल रुमची स्थापना केली. शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने 'अॅडव्हान्स टेक्नॉलॉजी सेंटर' विद्यापीठात चालू करण्यास मान्यता दिली आहे. (प्रतिनिधी)

22 MAR 2017 लोकमत
जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राजकीय अपेक्षातून लोकशाही प्रभावित

## वसंत भोसले : शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागाच्या राष्ट्रीय चर्चासत्राचे उद्‌घाटन

**कोल्हापूर :** जग विकासाच्या मार्गावर असताना आपल्या देशातील मूलभूत समस्या तशाच आहेत. या नैराश्येतून पारंपरिक सत्ताधारी नकोत, ही भावना प्रबळ झाल्याने राजकीय प्रवाह बदलला आहे, असे प्रतिपादन 'लोकमत'चे संपादक वसंत भोसले यांनी मंगळवारी केले. सोशल मीडियाच्या परिणामांमुळे लोकशाही प्रभावित झाली आहे, असेही ते म्हणाले.




**कोल्हापुरातील शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र व स्व. शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन केंद्रातर्फे मानव्यशास्त्र इमारतीमध्ये मंगळवारी आयोजित राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्‌घाटनप्रसंगी 'लोकमत'चे संपादक वसंत भोसले यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डावीकडून प्रा. डॉ. रवींद्र भणगे, प्रा. डॉ. प्रकाश पवार, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ प्रा. डॉ. जे. एफ. पाटील, प्रा. डॉ. वासंती रासम उपस्थित होत्या.**

येथील शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र व स्व. शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन केंद्रातर्फे मानव्यशास्त्र इमारतीमध्ये 'भारतीय लोकशाहीमधील बदलते प्रवाह आणि महिला सक्षमीकरण' या विषयावर आयोजित दोनदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्‌घाटनप्रसंगी ते 'निवडणुका आणि लोकशाही' या विषयावर बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ प्रा. डॉ. जे. एफ. पाटील होते. यावेळी राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. प्रकाश पवार उपस्थित होते.

संपादक भोसले म्हणाले, लोकशाही व्यवस्थेत बदल अभ्यासताना सामाजिक, आर्थिक परिस्थितीसह नवतंत्रज्ञान, सोशल मीडिया, माणसां-माणसांमधील संबंध या घटकांचाही विचार करायला हवा. स्वातंत्र्योतर काळात वर्गसंघर्ष, जातिव्यवस्था, हिंदू-मुस्लिम संघर्ष अजूनही प्रभावी ठरत असून राजकारणाचा प्रवाह बदलत आहे. एकविसाव्या शतकात सोशल मीडिया, नवतंत्रज्ञान प्रत्येकांपर्यंत पोहोचले आहे. त्यामुळे जग विकासाच्या मार्गावर असताना देशातील राजकीय व्यवस्था मूलभूत समस्या सोडवू शकत नसेल तर ती बदलायला हवी, अशी मानसिकता तयार झाली. त्याचा परिणाम गेल्या दोन वर्षांत विविध राज्यांत झालेल्या निवडणुकांतून दिसून येतो. प्रस्थापितांना नाकारणे आणि नव्या सत्ताधाऱ्यांना संधी देणे व त्यांच्याकडून विकासाची अपेक्षा ठेवली जात आहे. त्याचे प्रतिबिंब राजकारणात पडते आहे; परंतु नव्या राजकीय व्यवस्थेमुळे शेतीविषयक धोरणे, नैसर्गिक साधनसंपत्तीचे संवर्धन, पायाभूत सोयी-सुविधा, सामाजिक-आर्थिक परिस्थिती यामध्ये काही फरक पडला का याचे उत्तर शोधण्याची आवश्यकता आहे.

मनमोहन सिंग अर्थमंत्री असताना १९९१ मध्ये देशाने स्वीकारलेले धोरण आजही तेच धोरण बदललेले स्वीकारत असतील तर फक्त राज्यकर्ते बदलतील. आर्थिक व सामाजिक स्थित्यंतरे घडून येणार नाहीत याचाही विचार करायला हवा.

डॉ. पाटील म्हणाले, समाजाचे नियंत्रण व्यवस्थापन करून समाज घटकांचे कल्याण हे अभिजात राजकारण; परंतु त्या पद्धतीचे राजकारण लोकशाही उरले नाही. सत्ताकेंद्रासाठी कोणत्याही थराला राज्यकर्ते जात असल्याचे चित्र दिसते. सर्व राजकारण्यांनी गरिबी निर्मुलन हे सत्ता मिळविण्याचे साधन समजले तसेच सत्ताप्राप्तीसाठी काय वाट्टेल ते केले जाते. प्रा. डॉ. वासंती रासम यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. रवींद्र भणगे यांनी आभार मानले.

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 MAR 2017
तरुण भारत

# कार्यशाळातूनच जीएसटीचे महत्त्व लोकांना कळणार : बोहरी

**कोल्हापूर :** जीएसटीचे महत्व लोकांना समजून देण्यासाठी अशा कार्यशाळांची गरज आहे, असे मत एज्यू स्किल्स प्रा. लि. आयसीएचे अ-जाजू सैन के. बोहरी यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठ आणि आयसीए एज्यू स्किल्स यांच्या संयुक्त विद्यमाने जीएसटी विषयावर अध्यापक विकास या विषयावरील कार्यशाळेत ते बोलत होते. या विषयाचे तज्ञ चार्टर्ड अकौंटंट गगन केडिया यांनी जीएसटी विषयावर मार्गदर्शन केले. त्यानंतरच्या वक्त्यांनी प्राभावी अध्यापकांच्या निर्मितीसाठी आवश्यक कौशल्यांची माहिती दिली. शिवाजी विद्यापीठाचे वाणिज्य विभाग प्रमुख डॉ.ए.एम.गुरव यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत करीत सीए गगन केडिया त्यांच्या आजवरच्या कार्याची माहिती दिली. गगन केडिया यांना सात वर्षापेक्षा जास्त या क्षेत्राचा अनुभव आहे. डेलॉयट सारख्या नामांकित कंपनीमध्ये ते कार्यरत होते. आयसीए एज्यू स्किल्स भारतातील सर्वश्रेष्ठ व्यावसायिक प्रशिक्षण संस्थांपैकी एक आहे.ज्याचे अस्तित्व १०० मोठ्या शहरांबरोबरच काही छोट्या शहरांमध्ये सुद्धा आहे.स्वतंत्र तसेच संस्था आणि सरकारच्या सहकार्याने सुद्धा देशाच्या कौशल्य विकासाच्या कार्यक्रमात या कंपनीचे योगदान असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 2 MAR 2017
लोकमत

# विद्यापीठात आज कवितेवर चर्चासत्र

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील मराठी अधिविभागातर्फे आज, बुधवारी आधुनिक मराठी काव्यपरंपरा आणि प्रभाव क्षमता यावर चर्चासत्र होणार आहे. या चर्चासत्राचे उद्‌घाटन वि. स. खांडेकर भाषाभवनच्या सभागृहात सकाळी साडेदहा वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. नागनाथ कोतापल्ले यांच्या हस्ते होणार आहे.

आधुनिक मराठी काव्यपरंपरा आणि प्रभाव क्षमता या विषयाच्या अनुषंगाने मूल्यमापनात्मक मांडणी करण्यासाठी हे चर्चासत्र आयोजित केले आहे. (प्रतिनिधी)

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 MAR 2017

महाराष्ट्र टाईम्स

# मराठी काव्यपरंपरेवर आज चर्चासत्र

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागाच्यावतीने बुधवार (ता. २२) आधुनिक 'मराठी काव्यपरंपरा आणि प्रभाव क्षमता' विषयावर एकदिवसीय चर्चासत्र होणार आहे. वि. स. खांडेकर भाषाभवनमध्ये सकाळी साडेदहा वाजता चर्चासत्राचे उद्घाटन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांच्या हस्ते होणार आहे. चर्चासत्रामध्ये केशवसुत, बा. सी. मर्ढेकर, दिलीप चित्रे, अरुण कोलटकर, नामदेव ढसाळ, नारायण सुर्वे या कविंच्या प्रभावक्षमतेचा परामर्श अविनाश सप्रे, वसंत पाटणकर, सतीश काळसेकर, राजशेखर शिंदे, नितीन रिंढे हे शोधनिबंधातून घेणार आहेत. चर्चासत्रास उपस्थित राहण्याचे आवाहन मराठी विभाग प्रमुख डॉ. राजन गवस यांनी केले आहे.

22 MAR 2017

महाराष्ट्र टाईम्स

जनसपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जलपुनर्भरण नाहीतर मरण!

**यंदा पाऊस बरा पडलेला असल्याने पिण्याच्या पाण्यासाठीचा हाहा:कार सुरु झालेला नसला तरी तो लवकरच सुरु होण्याची चिन्हे आहेत. शहरातील दिवसाचा २४ तास पाणीपुरवठा हळूहळू प्रत्येक दिवशी एक तास व त्यानंतर मात्र एक दिवसाआड असा होणार आहे. सोलापूरसारख्या ठिकाणी तर आठवडयातून/ पंधरवड्यातून एक दिवस पाणी अशी परिस्थिती गतवर्षी पाहिलीच आहे. या वर्षीही त्याच दिशेने वाटचाल होताना दिसते आहे. मे महिन्यात अशी परिस्थिती उद्भवल्यास त्यात आश्चर्य वाटण्याचे कारण नाही.**

महाराष्ट्राचा सरासरी पाऊस २५०० मि.मी. धरल्यास ७७५ घन किमी पाणी पावसाद्वारे उपलब्ध होते. मग हे सर्व पाणी जाते कोठे? एक तर नद्यांना पूर येऊन ते समुद्राला मिळते; नाही तर, त्याचे बाष्पीभवन होते आणि किरकोळ प्रमाणात भूजलांना जाऊन मिळते. म्हणूनच आत्ताची सर्वांत महत्त्वाची गरज आहे ते पाणी साठवून ठेवण्याची!



आठवड्यातून एकदा पाणी येणार असेल तर, घरातील माऊली घरातली भांडी भरभरून ते पाणी साठविते आणि आठवडाभर ते पुरविण्याचे नियोजन करते. हेच नियोजन मोठ्या प्रमाणावर करावयाचे झाल्यास त्यालाच जलसंवर्धन (Water Conservation) म्हणतात. पृथ्वीवर पाणी साठविण्याचे मोठे भांडे म्हणून महाराष्ट्राचा विचार करू या. महाराष्ट्राच्या एकूण क्षेत्रफळाचा विचार करता ते ३,१०,००० चौकिमी आहे. ते एकूण ३५७ तालुक्यांत व ३,२२,४०० गावांत विभागलेले असून सरासरी पर्जन्यमान २५० मिली धरले तर, प्रतिमाणसी प्रतिवर्ष ६८९५ लिटर म्हणजेच प्रति माणसी प्रति दिवस १९ लिटर पावसाचे पाणी वर्षभरासाठी मिळते. प्रत्यक्षात याच पाण्याचा काटकसरीने वापर, पुनर्वापर, साठवण या गोष्टी कटाक्षाने करण्याची गरज आहे.

ढोबळ मानाने पाणी जमिनीत मुरविण्यासाठीच्या पद्धती पाझर तलाव, सिमेंट प्लग, रिचार्ज शाफ्ट, समांतर कंटूर, गॅबियन बंधारे, नालाबंडिंग, गाव तळे, भूगर्भीय बंधारे, इत्यादी आहेत. तसेच छतावर पडणारे पाणी जमिनीत मुरवायचे झाले, तर त्यासाठी रुफटॉप रेन वॉटर हार्वेस्टिंग व रनऑफ हार्वेस्टिंग या योजना राबवाव्या लागतात.

- वैयक्तिक पातळीवर जलपुनर्भरण हे प्रत्येकाने करणे आवश्यक आहेच. पण त्याचबरोबर पुढील काही बाबींचा गांभिर्याने विचार केला जाणेही गरजेचे आहे.
- जमिनीत पाणी न भरता पाणी उपसण्याचा मानवाला नैतिक अधिकारच नाही. पाणी उपसण्याच्या आधी मी आतापर्यंत जमिनीत किती पाणी भरले, हा प्रश्न विचारून मगच पाणी उपसायचे किंवा नाही, याचा विचार केला जावा.
- उपसा जास्त व पुनर्भरण कमी हीच परिस्थिती चालू राहिल्यास देश लवकरच संकटात सापडेल व पाणीप्रश्न भयावह स्वरुप धारण करेल, याची प्रत्येकाने जाणीव असू द्यावी.
- हे नुकसान भरून काढण्यासाठी कृत्रिम पुनर्भरणाचा मार्ग वापरून परिस्थिती आटोक्यात आणली जाऊ शकते. पण हे काम प्रत्येक नागरिकाने या कामात सहभागी होणे गरजेचे आहे.
- जलपुनर्भरण केले नाही तर जमिनीतून खूप खोलातून पाणी उपसल्यास खोलवर असलेली

## असे करा जलपुनर्भरण

रसायने पाण्याबरोबर बाहेर येतील व त्यांचा मानवी आरोग्यावर विपरित परिणाम होईल. तसेच त्यासाठी लागणारी विद्युतऊर्जाही जास्त लागेल.

- जलपुनर्भरण योजना राबवायची असल्यास काळ्या मातीचा थर हटविल्यास पुनर्भरण वेगाने होऊ शकेल. काळ्या मातीच्या खाली कच्चा व कडक मुरमाचा थर असतो. हे थर पाणी खाली जाऊ देण्यास मदत करतात व पुनर्भरणाचा जास्तीचा वेग साधता येतो.
- घरासभोवताली असलेल्या जमिनीवर किंवा जमिनीच्या आत टाक्या बांधून त्या टाक्यांमध्ये छतावरील पावसाचे पाणी जमा केले जाऊ शकते. आपल्याजवळ या खर्चासाठी किती पैसा आहे. आपली पाण्याची वार्षिक गरज काय आहे. व टाकी बांधण्यासाठी पुरेशी जागा उपलब्ध आहे की नाही, या सर्व बाबी तपासून टाकीचा आकार ठरवावा.
- प्रत्येकाने ठरवले की, माझ्या फ्लॅटमधील, बंगल्यामधील पाण्याचा एकही थेंब वाहून प्लॉटच्या बाहेर जाऊ देणार नाही. म्हणजे सर्वच्या सर्व पाणी जमिनीत मुरविले तर पुनर्भरण क्रियेला वेग येईल.
- घराच्या गच्चीवरुन पावसाचे पाणी जमिनीवर आणण्यासाठी एक रेनवॉटर पाइप आधीच टाकलेला असतो. त्याला तुकडा जोडून गच्चीवरील पावसाचे पाणी जमिनीतील खड्ड्यामध्ये आणून सोडता येते. पाऊस सुरू झाल्यानंतर गच्चीवरील पाणी या खड्ड्यापर्यंत येऊन वेगाने जमिनीत मुरावयास सुरवात होईल.
- काही जण तर गच्चीवरील पावसाचे पाणी सरळच बोअरमध्ये सोडतात. पण हे करीत असताना अस्वच्छ पाणी या द्वारे बोअरमध्ये जाणार नाही, याची दक्षता घ्यावी.

**कॅप्टन (डॉ.) नितीन सोनजे**
(लेखक जलशास्त्राचे अभ्यासक आणि शिवाजी विद्यापीठाचे उपकुलसचिव आहेत)

22 MAR 2017 सकाळ

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शेतकरी सक्षमीकरणाचा अर्थसंकल्प

## डॉ. विजय ककडे : कर्जमुक्तीच्या दिशेने वाटचाल; तज्ज्ञांचा सूर

कोल्हापूर, ता. २१ : राज्यातील शेतकऱ्यांना दीर्घकालीन उपाययोजनांद्वारे सक्षम आणि दुष्काळमुक्त करण्याच्या दृष्टीने यंदाच्या अर्थसंकल्पात शासनाने ठोस पावले उचलल्याचे मत शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख व अर्थतज्ज्ञ प्रा. डॉ. विजय ककडे यांनी व्यक्त केले. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या विभागीय माहिती कार्यालय आणि जिल्हा माहिती कार्यालयाच्या संयुक्त विद्यमाने शाहू स्मारक भवन येथे 'अर्थसंकल्प राज्याचा, संकल्प विकासाचा' विषयावरील चर्चासत्रात डॉ. ककडे बोलत होते.

चर्चासत्रात भारती विद्यापीठाच्या मॅनेजमेंट इन्स्टिट्यूटचे संचालक डॉ. नितीन नायक, कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी, ज्येष्ठ संपादक दशरथ पारेकर आणि स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक जॉर्ज क्रुझ यांनी अर्थसंकल्पावर सविस्तर विश्लेषण केले. अर्थतज्ज्ञ डॉ. विजय ककडे यांनी शेतीसमोरील संकटे आणि शेतकऱ्यांच्या होत असलेल्या आत्महत्या यावर दीर्घकालीन उपाययोजना यंदाच्या अर्थसंकल्पात असल्याबद्दल समाधान व्यक्त केले. उद्योग, व्यापार क्षेत्रालाही झुकते माप द्यायला हवे होते, अशी अपेक्षाही व्यक्त केली. राज्यावर कर्जाचे ओझे आहे. याचपटीत व्याजाचा मोठा बोजा आहे. यामुळे विकासकामांसाठी अल्प निधी मिळत आहे. शेती, दुष्काळ, पायाभूत सुविधा यांसारख्या प्रश्नांवर सर्जिकल स्ट्राईक करणारा हा अर्थसंकल्प आहे. कोल्हापूरसाठी पर्यटन, रस्ते, औद्योगिक प्रशिक्षण या गोष्टींवर अधिक तरतूद होऊन राष्ट्रीय मानव निर्देशांक वाढविण्याची गरजही त्यांनी या वेळी व्यक्त केली.




कोल्हापूर : अर्थसंकल्पावर आयोजित चर्चासत्रात बोलताना डॉ. अशोक ककडे. शेजारी उपस्थित तज्ज्ञ.

भारती विद्यापीठाच्या मॅनेजमेंट इन्स्टिट्यूटचे संचालक डॉ. नितीन नायक म्हणाले, ''यंदाचा अर्थसंकल्प शेतीपूरक अर्थसंकल्प दिसत असून, यामध्ये शेती आणि शेतकऱ्यांच्या विकासाबरोबर उच्च शिक्षणासाठी भरीव तरतूद अपेक्षित होती. प्रमोद महाजन कौशल्य विकास कार्यक्रमावर दिलेला भर महत्त्वाचा आहे.''

चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललीत गांधी म्हणाले, ''केंद्राच्या अर्थसंकल्पात शेती क्षेत्रावर सर्वाधिक तरतूद केली आहे. शेतीच्या विकासाद्वारे व्यापार उद्योग क्षेत्रालाही साहाय्यभूत होण्याचे धोरण या अर्थसंकल्पात आहे.''

स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक जॉर्ज क्रुझ म्हणाले, ''पायाभूत सुविधांना प्राधान्य देऊन सर्व घटकांना न्याय देण्याचा चांगला प्रयत्न या अर्थसंकल्पाद्वारे झाला आहे. शिक्षण, सामाजिक न्याय यासारख्या क्षेत्रामध्ये शासन भरीव तरतूद करत असले तरी हा निधी संपूर्णपणे खर्च करण्याची जबाबदारीही प्रशासनाने घेतली पाहिजे. कर्जमाफीपेक्षा कर्जाचे दर कमी करून शेतकऱ्याला सहजासहजी कर्ज उपलब्ध व्हावे.''

माहिती उपसंचालक सतीश लळीत यांनी प्रास्ताविक केले. सहायक संचालक एस. आर. माने यांनी स्वागत केले. जिल्हा माहिती अधिकारी वर्षा पाटोळे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. माहिती सहायक अर्चना माने यांनी आभार मानले. वृत्तपत्र विद्या विभागाचे माजी प्रमुख डॉ. रत्नाकर पंडित उपस्थित होते.

### शेतीसाठी भरीव तरतुदीचा सूर

कर्जमाफी करण्यापेक्षा शेतकरी कायमस्वरूपी कर्जमुक्त करून शेतीला भरीव तरतूद यंदाच्या अर्थसंकल्पात केल्याचा तज्ज्ञांचा सूर होता. शेती सिंचन, कौशल्य विकास, रस्तेविकास अशा पायाभूत सुविधांवर शासनाने लक्ष केंद्रित करून भरीव तरतूद केली. या योजनांची परिणामकारक अंमलबजावणी होऊन शेतकरी सक्षम बनविण्याबरोबरच शाश्वत कृषी विकासाचे स्वप्न साकार करण्याची जबाबदारी महत्त्वाचे असल्याचेही वक्त्यांनी स्पष्ट केले.